# ३. म्हणी

विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो,

कधी कधी खूप मोठा आशय सांगण्यासाठी किंवा अनुभव व्यक्त करण्यासाठी लहान लहान तालबद्ध बोध देणारी अशी चटकदार वाक्ये बोलण्यात येतात. लोकांच्या बोलण्यातून ती प्रकटलेली असतात आणि त्याची यथार्थता, त्याचा चटकदारपणा पटल्यामुळे ती वारंवार लोकांच्या 'म्हणण्यात' येत असतात. आपणही सरावाने अशी वाक्ये सहज वापरत असतो.

परीक्षा जवळ आली आहे. आणि अजूनही बराच अभ्यास बाकी राहिला आहे, अशावेळी आपण सहज 'रात्र थोडी सोंगे फार' म्हणतो. अशा वाक्यांना 'म्हण' असे म्हणतात. म्हणीतून सूत्रमय पद्धतीने थोडक्यात शहाणपणाचे जणू सिद्धांतच मांडलेले असतात.

पुढे काही म्हणी त्यांच्या अर्थासह दिल्या आहेत. प्रत्येक अक्षराच्या शेवटी काही म्हणींचा वाक्यात उपयोग करून दाखवला आहे. त्यामुळे त्यांचा अर्थ अधिक स्पष्ट होईल.

## अं

**अंगाला सुटली खाज हाताला नाही लाज** – माणूस विकाराच्या अधीन असतो. त्यामुळे तो लाजलज्जा सोडतो

**अंगी उणा तर जाणे खाणाखुणा** – जेव्हा एखाद्या दोषाबद्दल बोलणे निघते तेव्हा आपणासंबंधीच बोलत आहेत असे वाटते

**अंगी नाना कळा, पण वेश बावळा** – एखादा मनुष्य फार गुणी असतो, पण त्याच्या पोशाखावरून त्याच्या बुद्धीची प्रथम कल्पना येत नाही

**अंगी धावे कामासाठी गती झाली उफराटी** – एखादा मनुष्य एखादे काम करण्यासाठी खूप परिश्रम करतो, पण योग्य दिशा न मिळाल्याने त्याचे श्रम व्यर्थ जातात

**अंगापेक्षा बोंगा मोठा**– खऱ्या गोष्टीपेक्षा अवडंबरच अधिक

**अंगावरचे लेणे जन्मभर देणे** – दागिन्यांकरिता कर्ज काढून ठेवून ते जन्मभर फेडीत बसणे

**अंतकाळापेक्षा मध्यान्ह काळ कठीण** – मरणा वेदनांपेक्षा भुकेच्या वेदना अधिक दुःखद असतात

**अंथरूण पाहून पाय पसरावे** – आपली ऐपत वकूब पाहून वागावे

**अंधारात चोरास बळ** – अनुकूल परिस्थिती होताच माणसाचे बळ अधिक वाढत असते

**अंतरी पापाच्या कोडी, वरी दाढी मिशा** – मनात पापवासना कायम असताना बाह्यशुद्ध काय उपयोग?

**अंधारात गूळ खाल्ला तरी तो गोडच लागतो** चांगली गोष्ट कोणत्याही परिस्थितीत केली तिचा परिणाम चांगलाच होतो

– वाक्यात उपयोग –

- **वेश बावळा परी अंगी नाना कळा**

सामान्य दिसणाऱ्या वक्त्याच्या भाषणातील

आणि समजावून सांगण्याची हातोटी ही विद्वत्ता बघून **वेश बावळा परी अंगी नाना कळा** याची उपस्थितांना खात्री पटली.

- **अठरा विसवे दारिद्र्य**

**घरात अठरा विसवे दारिद्र्य** असतानाही आईवडिलांना मदत करुन निशाने परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावल्याने सर्वांनी तिचे मनापासून कौतुक केले.

- **अंगी धावे कामासाठी गती झाली उफराटी**

गावात वीज येण्यासाठी मनोजने सरकारी कार्यालयात खूप धावाधाव केली पण नेमकी प्रक्रिया न कळल्याने अजूनही गाव अंधारातच राहिले. म्हणून म्हणतात **अंगी धावे कामासाठी गती झाली उफराटी.**

- **अंगी उणा तर जाणे खाणाखुणा**

पटकन एखादी वस्तू खिशात घालण्याची सवय असलेला राजू, गप्पांमध्ये नकळत होणाऱ्या चोरीबद्दल चर्चा चालू असलेली ऐकून कानकोंडा झाला. **अंगी उणा तर जाणे खाणाखुणा** म्हणतात ते खरेच.

- **अंगापेक्षा बोंगा मोठा**

निमाने दादाच्या एकविसाव्या वाढदिवसाची छोटीशी भेटवस्तू एकवीस कागदांमध्ये खुबीने लपविली तशी आजी हसून म्हणाली,''काहीतरीच हं तुझं निमा, हे म्हणजे **अंगापेक्षा बोंगा मोठा असं झालं आहे.**''

- **अंगावरचे लेणे जन्मभर देणे**

बायकोच्या हट्टाखातर राजनने कर्ज काढून तिला सोन्याच्या बांगड्या तर केल्या पण व्याजासह ते फेडताना तो अगदी त्रासून गेला. **अंगावरचे लेणे जन्मभर देणे** असे उगाच म्हणत नाहीत.

- **अंथरुण पाहून पाय पसरणे**

माझा वाढदिवसपण माझ्या मैत्रिणीसारखा मोठ्या हॉटेलमध्येच करायचा असा हट्ट धरून बसलेल्या ओवीला तिच्या आईने नेहमीच **अंथरुण पाहून पाय पसरावे** हा लक्षात ठेवण्यासारखा सल्ला दिला.

---

## अ

**अकातली गाय अन् काटे खाय** – दु:खी व्यक्ती काहीही करायला तयार असते.

**अगं अगं म्हशी मला कुठे नेशी?** – चूक करून ती मान्य न करता; उलट ती चूक दुसऱ्याच्या माथी मारून मोकळे व्हायचे.

**अगं माझे बायले सर्व तुला वाहिले** – आपल्या पत्नीच्या म्हणण्याप्रमाणे वागणारा माणूस.

**अचाट बुद्धी चालवावी आणि बळेच लक्ष्मी मिळवावी** – बुद्धी तेज असून तिचा योग्य उपयोग केला तर संपत्ती आपण होऊन घरी चालून येते.

**अचाट खाणे, मसणात जाणे** – खाण्या-पिण्यात अतिरेक झाल्यास परिणाम वाईट होतो.

**अटक्याचा सौदा येरझारा चौदा** – अडल्या कामासाठी अधिक परिश्रम करणे.

**अठरा विसवे दारिद्र्य** – अतिशय गरिबी.

**अडक्याची भवानी सापिकेचा शेंदूर** – क्षुल्लक वस्तूसाठी भरमसाठ खर्च.

**अडली गाय फटके खाय** – एखादी व्यक्ती अडचणीत सापडली की तिला हैराण केले जाते.

**अडाण्याची मोळी भलत्यासच गिळी** – अडाणी मनुष्याने एखादी गोष्ट केली असता तिचा परिणाम विपरीत होतो.

**अडला हरी गाढवाचे पाय धरी** – अडचणीच्या वेळी मूर्खाचीही खुशामत करण्याची पाळी येते.

**अतिशहाणा त्याचा बैल रिकामा** – स्वत:ला अतिशहाणा समजणारा प्रत्यक्षात कृती करत नाही.

**अति तेथे माती** – कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईटच असतो.

**अति उदार तो सदा नादार** – जी व्यक्ती उधळपट्टी करते, ती नेहमी दिवाळखोरीत जाते.

आखाड्याच्या मैदानात पहिलवानाची किंमत – योग्य माणसाचा योग्य ठिकाणी उपयोग.

**आग सोमेश्वरी बंब रामेश्वरी** – गरजूंना मदत न करता ज्याला गरज नाही त्याच्या मदतीला धावणे.

**आगीतून उठून फुफाट्यात पडणे** – एका मोठ्या वाटणाऱ्या संकटातून बाहेर पडून दुसऱ्या मोठ्या संकटात सापडणे.

**आचार भ्रष्टी सदा कष्टी** – ज्याचे आचार विचार चांगले नसतात, तो नेहमी दुःखी असतो.

**आज अंबारी तर उद्या झोळी** – कधी वैभव तर कधी दैन्य.

**आज मरा, उद्या धर्म करा** – मरणोत्तर धर्मकृत्य करण्यापेक्षा आधीच करा.

**आजा मेला नातू झाला, घर जीव बरोबर** – एखादे नुकसान झाले असता त्याच वेळी दुसरी फायद्याची गोष्ट घडणे.

**आठ पुरभय्ये नऊ चौके** – एकाचे दुसऱ्याशी न जमणे.

**आठ हात लाकूड, नऊ हात धलपी** – अत्यंत मूर्खपणाची अतिशयोक्ती.

**आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार?** – जे मुळातच नाही, त्याची थोडीदेखील अपेक्षा करणे व्यर्थ आहे.

**आडातला बेडूक समुद्राच्या गोष्टी सांगे** – संकुचित वृत्तीचा मनुष्य विशालतेचा विचार सांगतो.

**आडवे बोट घातल्याशिवाय लोणी निघत नाही** – सरळ धोपट मार्गाने सर्वच ठिकाणी यश मिळत नाही, कधीकधी आडमार्गाचाही वापर करावा लागतो.

**आत्याबाईला मिशा असत्या तर काका म्हटले असते.** – अशक्य गोष्टीची चर्चा करण्यात अर्थ नसतो.

**हाथी गेली नि पोथी गेली** – दोन्हीकडून नुकसान.

**आधणातले रडतात अन् सुपातले हसतात** – स्वतः संकटात असतानाही दुसऱ्याचे दुःख पाहून हसू येते.

**आधीच उल्हास त्यात आला फाल्गुन मास** – मुळातच आळशी व्यक्तीस अनुकूल परिस्थि[ती] निर्माण होणे.

**आधीच मर्कट तशातही मद्य प्यायला** – आधी[च] बुद्धी विचित्र, तशात भलतेच प्रोत्साहन मिळाले [तर] चेष्टांना ऊत येतो.

**आधी शिदोरी, मग जेजुरी** – आधी भोजन, [म]ग भजन.

**आधी जाते बुद्धी मग जाते लक्ष्मी** – एकदा बु[द्धी] भ्रष्ट झाली की माणसाचे आचरण बिघडते, परिणा[मी] वित्तहानी होऊन दुर्दशा होते.

**आधी पोटोबा मग विठोबा** – आधी स्वार्थ [म]ग परमार्थ.

**आधीच तारे आणि त्यात शिरले वारे** – आधी[च] वेडगळ त्यात त्याला अजून बहकवणारी घट[ना] घडणे.

**आपला हात जगन्नाथ** – आपली उन्न[ती] आपल्याच कर्तृत्वावर अवलंबून असते.

**आपला तो बाब्या, दुसऱ्याचे ते कारटे** – जे आप[ले] आहे ते चांगले, दुसऱ्याचे आहे ते वाईट अशी प्रवृ[त्ती].

**आपली पाठ आपल्याला दिसत नाही** – स्वत[ःचे] दोष स्वतःला दिसत नाहीत.

**आपल्या कानी सात बाळ्या** – एखाद्या वा[ईट] कृत्यात आपले अंग मुळीच नाही असे दाखविणे.

**आपल्याच पोळीवर तूप ओढणे** – स्वार्थी प्रवृत्ती स्वतःचाच तेवढा फायदा साधून घेणे.

**आपलेच दात आपलेच ओठ** – आपल्या आ[प्त]जनांनी केलेल्या चुका चारचौघांत उघड न करता त्यावर पांघरूण घालावे लागते.

**आपले नाही धड, शेजाऱ्याचा कढ** – आपली परिस्थिती चांगली नसताना इतरां[च्या] परिस्थितीविषयी कळकळ दाखविणे.

**आपले नाक कापून दुसऱ्यास अपशकुन** – आ

तर नुकसान करायचे, पण दुसऱ्याचेही करायचे.

**आपले ठेवायचे झाकून, दुसऱ्याचे पाहायचे वाकून** – आपले दोष लपविणे आणि दुसऱ्याचेच पाहणे.

**आयत्या बिळावर नागोबा** – दुसऱ्याच्या श्रमाचे फळ आपल्याकडे घेऊ पाहणे.

**आयत्यावर कोयता**– श्रम न करता लाभ उठवणे.

**आयत्या पिठावर रांगोळी** – दुसऱ्याच्या परिश्रमावर स्वतःचा फायदा करून घेणे.

**आला चेव तर केला देव नाही तर हरहर महादेव** – नियमित असे काहीच करायचे नाही.

**आला बेअकली बिन बैलानं गाडी हाकली** – मूर्ख माणूस जीवनात काही करू शकत नाही.

**आला हंगाम, आला माल, निंदणाचे तेच हाल** – कितीही पैसा कमविला तरी शेवटी कमीच असतो.

**आलीया भोगासी असावे सादर** – नशिबात असेल ते भोगावेच लागते, त्यासाठी कुरबूर न करता तयारच असले पाहिजे.

**आले अंगावर तर घेतले शिंगावर** – मिळालेल्या संधीचा फायदा करून घेणे.

**आवळा देऊन कोहळा काढणे** – दुसऱ्यासाठी थोडेसे काहीतरी करून त्याच्या बदल्यात स्वतःचा भरपूर फायदा करून घेणे.

**आशेने शेत शंभराला घेतले काय, विकले काय, सारखेच** – केवळ आशा करून यश मिळत नाही, त्यासाठी कामही करावे लागते.

**आसू ना मासू, कुत्र्याची सासू** – जेथे जिव्हाळा नाही तेथे दुःख नाही.

**आंधळ्या गाईंत लंगडी गाय शहाणी** – अडाणी माणसात एखादा जरासा शहाणा मोठ्या पंडितासारखा वागतो.

**आंधळा मागतो एक डोळा देव देतो दोन** – एका इच्छित गोष्टीबरोबर अनपेक्षितपणे दुसरी एखादी गोष्ट मिळणे, अपेक्षेपेक्षा अधिक लाभ होणे.

**आंधळी पाण्याला गेली घागर फोडून घरी आली** – अडाणी माणसाला दिलेल्या कामाचा चुथडा होतो.

**आंधळ्याशी जग सारेची आंधळे** – लोक आपल्यासारखेच दुसऱ्यालाही समजतात.

**आंधळे दळते कुत्रे पीठ खाते** – एकाने काम करावे आणि दुसऱ्याने त्याचा फायदा घ्यावा.

**आंधळ्या बहिऱ्याची गाठ** – एकमेकांना मदत करण्यास असमर्थ असणाऱ्या दोन माणसांनी एकत्र येणे.

**आग खाईल तो कोळसे ओकेल** – केलेल्या कर्माचे भोग कधीतरी भोगावेच लागतात.

**आयजीच्या जिवावर बायजी उदार** – स्वतःची हौसमौज दुसऱ्याच्या पैशावर भागविणाऱ्या अप्रामाणिक व्यक्तीसाठी वापरली जाणारी म्हण.

**आदळून जेवण आणि ओरडून दान** – मोठेपणा मिळवण्यासाठी क्षुल्लक दानधर्मांचा गवगवाच फार करणे.

**आमंत्रण दिले सगळ्या गावा, वादळ सुटले घरी जेवा** – इतरांना खोटी खोटी आश्वासने देऊन स्वतःचा मोठेपणा मिरविणे.

**आली सुगी फुगले गाल, गेली सुगी मागचे हाल** – सुबत्तेच्या काळात कमालीची चैन आणि भविष्यासाठी काहीही राखून न ठेवणे.

**आडात गूळ आणि झाडाला कानोला** – अव्यवस्थित व निष्काळजीपणे केलेले काम, ज्यामध्ये कशाचाच कशाला थांगपत्ता नाही अशा अर्थाची म्हण.

### – वाक्यात उपयोग –

- **आईची माया अन् पोर जाईल वाया**

वडील रागावल्यावर प्रत्येक वेळा संजयला पाठीशी घालणाऱ्या आईला आज त्याने शाळेत केलेल्य चोरीबद्दल ऐकून सासूबाईंचे वाक्य आठवले '**आईच माया अन् पोर जाईल वाया**'.

- **आचार भ्रष्टी सदा कष्टी**

नेहमीच याची टोपी त्याला, त्याची टोपी याला अ

• **इच्छा तेथे मार्ग**

पायाला प्लॅस्टर घातल्याने घराबाहेर पडणे बंद झाले तरी निशाने भ्रमणध्वनीवरून गाण्याची शिकवणी चालू ठेवली होती. **इच्छा तेथे मार्ग** हे तिने सर्वांनाच दाखवून दिले.

• **इनमीन साडेतीन**

पावसामुळे गणेशोत्सव मंडळाच्या विविध गुणदर्शन कार्यक्रमाला **इनमीन साडेतीन** प्रेक्षक आल्याने कलाकारांची घोर निराशा झाली.

• **ईश्वर जन्मास घालतो त्याचे पदरी शेर बांधतो**

पुरामुळे झालेल्या नुकसानासाठी शोक करीत असलेल्या महादुला आजीने सांत्वन करून सांगितले की 'अरे, काळजी करू नको, **ईश्वर जन्मास घालतो त्याचे पदरी शेर बांधतोच**.'

## उ

**उंटावरची चोरी ओणव्याने लपत नाही** – उघड-उघड जेव्हा दुष्कृत्य होते तेव्हा ते लपविण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ असते.

**उंदराला मांजर साक्ष** – दोघेही सारखेच दोषी व एकमेकांचे साथीदार.

**उंदीर गेला लुटी, आणल्या दोन मुठी** – प्रत्येक मनुष्य आपल्या क्षमतेनुसार काम करतो.

**उंदीर मेला अन् गाव गोळा झाला** – क्षुल्लक गोष्टीचा गवगवाच फार.

**उतावळा नवरा, गुडघ्याला बाशिंग** – उतावळेपणाने मूर्खासारखे वर्तन होते.

**उखळात डोके घातल्यावर मुसळाला कोण भितो?** – कोणतेही संकट आले तरी सोसायला मन तयार झाल्यावर कशाचीच भीती राहात नाही.

**उथळ पाण्याला खळखळाट फार** – अल्पज्ञानी फार बढाया मारतो.

**उगळला तर परमेश्वर, खुंटला तर शनैश्चर** – असा माणूस की खुशीत असला तर हर प्रकारे मदत करतो आणि नाराज झाला तर नुकसान करतो.

**उडदामाजी काळेगोरे काय निवडावे निवडणारे?** – बरेवाईट सर्वत्रच असते.

**उधार तेल खवट** – उधारीच्या वस्तूंत काहीना काही कमी असतेच.

**उंबर पिकले आणि नडगीचे (अस्वलाचे) डोळे आले** – फायद्याची वेळ येणे; पण लाभ न घेता येणे.

**उंबर फोडून केंबर काढणे** – लहानशा कामाचा अभिमान धरून मोठ्या गोष्टीचा विध्वंस करणे. डोंगर पोखरून उंदीर काढणे.

**उभारले राजवाडे तेथे आले मनकवडे** – श्रीमंत माणसापाशी खुशामत करणारे गोळा होत असतात.

**उभा जोवरी शोभा तोवरी** – तारूण्यात मिळणारा मान उतारवयात मिळत नाही; जोपर्यंत पैसा असतो तोपर्यंत चलती असते.

**उभ्याने यावे आणि ओणव्याने जावे** – येते वेळी ताठ मानेने यावे आणि जाते वेळी खाली मा[न] घालून जावे.

**उधारीचे पोते सव्वा हात रिते** – माल उध[ार] घेणाऱ्याचे वजन, माप, भाव इ. मध्ये नेहमी नुकस[ान] होते, म्हणून उधारीचा व्यवहार करू नये./उध[ार] देणारा वजनात मारून फायदा घेतो.

**उधळ्याच्या हाती, पैशाची माती** – उधळ[्या] माणसाच्या हाती कितीही पैसा आला तरीही त्याची विल्हेवाट लावून टाकतो.

**उद्योगाचे घरी, रिद्धी सिद्धी पाणी भरी** – मनुष्य उद्योग करतो त्याचे घरी समृद्धी येते.

**उचललं पाल अन् पुढच्या गावा चाल** – स[...] एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी बिऱ्हा[...] भटकंती करणे.

**उसरा पसारा, देवाचा आसरा** – सारे [...] केल्यावर देवाची प्रार्थना करणे.

मार्गाने शोध घेण्याचा प्रयत्न करणे.

**काजव्याचा उजेड त्याच्या अंगाभोवती** – क्षुद्र गोष्टींचा प्रभावही तेवढ्यापुरता असतो.

**काडीची सत्ता आणि लाखाची मत्ता बरोबर होत नाही** – संपत्तीपेक्षा सत्ता महत्त्वाची ठरते.

**काट्याचा नायटा करणे** – एखाद्या क्षुल्लक गोष्टीचा भलताच विपर्यास करणे, राईचा पर्वत करणे, पराचा कावळा करणे.

**कान आणि डोळे यांच्यात चार बोटाचे अंतर असते.** – ऐकलेले व प्रत्यक्ष पाहिलेले यात बरीच तफावत असते.

**कावळ्याच्या शापाने गाई मरत नसतात** – क्षुद्र माणसाने थोरामोठ्यांना कितीही दूषणे दिली तरी थोरामोठ्यांचे काही बिघडत नाही.

**काडीचोर तो माडीचोर** – जो लहानशी चोरी करतो असे सिद्ध झाले तर त्याच्यावर पुढे मोठ्या चोरीचा आळ आणतात.

**काप गेले भोके राहिली** – वैभव गेले आणि त्याच्या खुणा राहिल्या.

**काही सोन्याचा गुण काही सवयीचा गुण** – एखादी गोष्ट घडवून आणण्यास जशी थोरामोठ्यांची मदत लागते तसे लहानांचेही साहाय्य लागते.

**काळ आला होता, पण वेळ आली नव्हती** – सर्व नाश होण्याची वेळ आली होती; पण थोडक्यात बचावले.

**कामापुरता मामा** – गरजेपुरता गोड बोलणारा.

**कानाला ठणका न नाकाला औषध** – रोग एकीकडे आणि औषध भलतीकडे.

**कानामागून आली आणि तिखट झाली** – मागून येऊन वरचढ होणे.

**काखेत कळसा अन् गावाला वळसा** – वस्तू जवळच असते, पण गावभर शोधाशोध. आपल्याला हवी असलेली वस्तू आपल्याजवळच असताना तिची जाणीव नसणे व तिच्या प्राप्तीसाठी धावाधाव करणे.

**काशीत मल्हारी महात्मा** – नको तेथे नको ती गोष्टी करणे.

**कानात बुगडी, गावात फुगडी** – आपल्या जवळच्या थोड्याशा संपत्तीचे मोठे प्रदर्शन करणे.

**काल मेला आणि आज पितर झाला** – हातात थोडासा अधिकार येताच सत्ता गाजविणे.

**कावीळ झालेल्यास सर्व पिवळे दिसते** – पूर्वग्रहित व्यक्तीला सर्वत्र दोषच दिसतात.

**कावळा बसायला अन् फांदी तुटायला** – एकाचा दुसऱ्या गोष्टीशी काहीही संबंध नसताना योगायोगाने त्यांचे एकाच वेळी घडणे.

**काठी मारल्याने पाणी दुभंगत नाही** – अतूट नाते किरकोळ कारणांनी तुटत नाही.

**काकडीची चोरी, फाशीची शिक्षा** – लहान गुन्ह्याला मोठी सजा.

**कानाला कोपर जडेना, सासू मेली जावई काही रडेना** – माया, प्रेम, सहानुभूती या गोष्टी उपजत असाव्या लागतात, त्याचे नाटक करता येत नाही.

**क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे** – काहीही काम न करता बडबड करणे व्यर्थ आहे.

**कुंभार तसा लोटा आणि बाप तसा बेटा** – जसे आई–बाप तशी संतती.

**कुंपणाने शेत खाल्ले** – ज्याच्या हाती रक्षणाचे काम दिले त्यानेच नुकसान केले.

**कुंभाराच्या घरातला किडा कुंभाराचा** – आपल्या ताब्यात आलेल्या वस्तूवर आपलाच हक्क प्रस्थापित करणे; एखाद्याच्या स्वाधीन झाल्या त्याची मते स्वीकारावी लागणे.

**कुडास कान ठेवी ध्यान** – भिंतीच्या आडू एखाद्याने गोष्टी ऐकल्या म्हणजे त्या बाहेर फुटतातच

**कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ** – आपलाच मनुष्य आपल्या नाशाला कारणीभूत होणे.

**कुठे जाशी भोगा तो तर तुझ्यापुढे उभा** –

संकट येऊ नये, अशी आपली मनोमन इच्छा असते तेच संकट समोर येऊन उभे ठाकते.

**कुसंतानापेक्षा नि:संतान बरे** – दुर्वर्तनी अपत्यांपेक्षा अपत्य नसणे बरे.

**कुत्र्याचे शेपूट नळीत घातले तरी वाकडे ते वाकडेच** – अविचारी व मूर्ख माणसाला कितीही समजावून सांगितले तरी त्याचा काहीही उपयोग होत नाही. कितीही प्रयत्न केला तरी काही म णसांच्या स्वभावातील दोष दूर होत नाहीत.

**कुडी तशी पुडी** – शरीर प्रकृतीप्रमाणे माणसाचा आहार असतो.

**केळीवर नारळी आणि घर चंद्रमौळी** – अत्यंत गरिबीची अवस्था.

**केर डोळ्यात, फुंकर कानात** – भलत्याच जागी भलताच उपाय.

**केळी खाता हरखले, हिशेब देता टरकले** – फुकटचा पैसा असेपर्यंत काही वाटले नाही, पैसाच संपताच मात्र त्याचा हिशेब देताना कष्ट झाले.

**केरसुणी पाहून जातं अन् दिवा पाहून येतं** – कष्टातूनच माणसाला समृद्धी लाभते, त्याचे भाग्य उजळते.

**केस उपटल्याने मढे हलके होत नाही** – क्षुल्लक काटकसर करण्यात अर्थ नसतो.

**कोंबडे झाकले म्हणून तांबडे फुटायचे राहत नाही** – एखादी बातमी बाहेर फुटू नये म्हणून कितीही प्रयत्न केले तरी ती बातमी बाहेर फुटल्याशिवाय राहत नाही.

**कोठे इंद्राचा ऐरावत आणि कोठे शामभटाची तट्टाणी** – एक अतिशय थोर तर एक अतिशय क्षुद्र यांची तुलना होऊ शकत नाही.

**कोठे राजा भोज, कोठे गंगू तेली** – चांगल्या स्तूबरोबर क्षुद्र वस्तूंची बरोबरी करणे.

**ल्ह्याला द्राक्षे आंबट** – जी गोष्ट आपल्याला ळूच शकत नाही ती वस्तू चांगली नाही असे सांगणे. ती मिळविण्यास आपण लायक नसल लोकांना जाणवू न देणे.

**कोरड्याबरोबर ओले जळते** – वाईट सं असले की निष्कारण सजा होणे.

**कोळसा उगाळावा तितका काळाच** – मुळात असणाऱ्या गोष्टीवर कितीही चर्चा केली अथवा कितीही ऊहापोह केला तरी ती वाईटच असते

**कोणाचे पागोटे कोणाच्या डोक्यावर** – अति गोंधळाची परिस्थिती.

**कोरी घागर सदा रिकामी** – नवशिक्या माण कितीही सांगितले, तरी तो चुका करतोच.

**कोळशाच्या व्यापारात हात काळेच** – वाईट केले तर वाईटपणा येणार.

**कोल्हा काकडीला राजी** – क्षुद्र माणसे क्षुद्र व भाळतात.

**कोणाची म्हैस, कोणाला उठबैस** – काम आणि त्रास दुसऱ्यालाच.

**कोळशाला आला दर, जाळून टाकले घ** तात्पुरत्या फायद्याचा विचार करून दू नुकसानीचा व्यवहार करणे.

### – वाक्यात उपयोग –

- **कर नाही त्याला डर कशाला?**

अनावश्यक चौकशीचा ससेमिरा मागे लागूनही शांतच होती. बाबांनी काळजीने कारण विचा म्हणाली, ''मी निर्दोष आहे. मग का घाबरू? **नाही त्याला डर कशाला?**''

- **काठी मारल्याने पाणी दुभंगत नाही**

असीम आणि आकाश या जीवश्चकंठश्च मित्र फूट पाडण्याचा प्रयत्न अनेकांनी केला पण यश आले नाही, म्हणतातच ना **काठी मार पाणी दुभंगत नाही.**

- **कवड्यांचे दान वाटले, गावात नगारे वा**

झोपडपट्टीतल्या मुलांना प्रथमच वह्या

**गळ्यातले तुटले ओटीत पडले** – नुकसान होता होता टळणे.

**गवयाचे पोर रडले तरी सुरावरच रडणार** – ज्याचे घरी जो पिढीजात धंदा असतो त्याला ते काम सहज साध्य होते.

**गवत्या बसला जेवाया आणि ताकासंगे शेवाया** – अडाणी मनुष्य चांगल्या वस्तूचा योग्य उपयोग करू शकत नाही.

**गळ्यात गरसोळी आणि गावात बोंब** – वस्तू जवळच असते, पण गावभर शोधाशोध.

**गळा कापला खोकला गेला** – आजारापेक्षा उपचारच भयंकर असणे.

**गणगोताने भरले गाव, तहान लागली विहिरीवर जाव** – गावात पुष्कळ नातेवाईक आहेत, पण प्रसंगी कुणीच मदत करत नाही.

**गळा नाही सरी, सुखी निद्रा करी** – ज्या स्त्रीच्या अंगावर दागदागिने नसतात, तिला सुखाने शांत झोप लागते.

**गळा पडते, गळसरी तोडते** – ओढूनताणून संबंध दाखवून स्वार्थ साधून घेणे.

**गाढवाच्या पाठीवर साखरेची गोणी** – एखाद्या गोष्टींची अनुकूलता असून उपयोग होत नाही, त्याचा फायदा करून घेतला पाहिजे.

**गाढवाला गुळाची चव काय?** – ज्याला एखाद्या गोष्टीचा गंध नाही त्याला त्या गोष्टीचे महत्त्व कळू शकत नाही.

**गाढवापुढे वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता** – मूर्खाला कितीही उपदेश केला तरी त्याच्या मनावर काहीच परिणाम होत नाही.

**गाव करी ते राव न करी** – समुदायाने जे काम होईल ते राजाच्या हातूनही होणार नाही; श्रीमंत मनुष्य पैशाच्या बळावर जे करू शकणार नाही, ते सामान्य माणसे एकीच्या बळावर करू शकतात.

**गाढवांचा गोंधळ व लाथांचा सुकाळ** – मूर्ख लोक एकत्र आल्यास चांगले काम न होता, गोंधळातच भर पडते.

**गावंढ्या गावात गाढवी सवाशीण** – वासरात लंगडी गाय शहाणी.

**गाड्याबरोबर नळ्याची यात्रा** – मोठ्या लोकांबरोबर आश्रितांचाही फायदा होतो.

**गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाही तर मोडून खाल्ली** – एखादी गोष्ट साध्य झाली तर उत्तम, नाही तर तिचा उपयोग अन्य तऱ्हेने करून घेता येईल.

**गाव सगळा मामाचा एक नाही कामाचा** – अनेक सगेसोयरे असतात, पण प्रसंगी कुणीच मदत करीत नाही.

**गाव जळे नि हनुमान बेंबी चोळे** – दुसऱ्याचे नुकसान करून नामानिराळे राहणे.

**गाढवाने शेत खाल्ले ना पाप ना पुण्य** – अयोग्य व्यक्तीला एखादी गोष्ट दिल्याने ती वायाच जाते.

**गावात राहू नको म्हटले तर म्हणे सरपंच करता का?** – लहान गोष्ट देखील करण्यास नकार दिला तर, त्यापेक्षा मोठमोठ्या गोष्टीचे विकल्प सुचविणे.

**गावात नाही झाड, एरंडाला आला पाड** – अभावग्रस्त परिस्थितीत अल्पांशाने असलेली बाब देखील मोठी समजली जाते.

**गाय व्याली, शिंगी घोडा** – अघटित घटना घडणे

**गुळाचा गणपती आणि गुळाचाच नैवेद्य** – एखाद्याचे घ्यावयाचे आणि त्याला द्यावयाचे.

**गुरूची विद्या गुरूला फळली** – एखाद्याचा डाव त्याच्यावरच उलटविणे.

**गूळ नाही पण गुळाची वाचा तरी असावी** – आपण आर्थिक दृष्ट्या गरीब असलो तरी चालेल मात्र आपले बोलणे विनम्र असायला हवे.

**गोरा गोमटा कपाळ करंटा** – दिसण्यात सुंदर, प नशिबाने दुर्दैवी.

**गोष्टी गोष्टी अन् मेला कोष्टी** – लांबलचक गो

**गळ्यातले तुटले ओटीत पडले** – नुकसान होता होता टळणे.

**गवयाचे पोर रडले तरी सुरावरच रडणार** – ज्याचे घरी जो पिढीजात धंदा असतो त्याला ते काम सहज साध्य होते.

**गवत्या बसला जेवाया आणि ताकासंगे शेवाया** – अडाणी मनुष्य चांगल्या वस्तूचा योग्य उपयोग करू शकत नाही.

**गळ्यात गरसोळी आणि गावात बोंब** – वस्तू जवळच असते, पण गावभर शोधाशोध.

**गळा कापला खोकला गेला** – आजारापेक्षा उपचारच भयंकर असणे.

**गणगोताने भरले गाव, तहान लागली विहिरीवर जाव** – गावात पुष्कळ नातेवाईक आहेत, पण प्रसंगी कुणीच मदत करत नाही.

**गळा नाही सरी, सुखी निद्रा करी** – ज्या स्त्रीच्या अंगावर दागदागिने नसतात, तिला सुखाने शांत झोप लागते.

**गळा पडते, गळसरी तोडते** – ओढूनताणून संबंध दाखवून स्वार्थ साधून घेणे.

**गाढवाच्या पाठीवर साखरेची गोणी** – एखाद्या गोष्टींची अनुकूलता असून उपयोग होत नाही, त्याचा फायदा करून घेतला पाहिजे.

**गाढवाला गुळाची चव काय?** – ज्याला एखाद्या गोष्टीचा गंध नाही त्याला त्या गोष्टीचे महत्त्व कळू शकत नाही.

**गाढवापुढे वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता** – मूर्खाला कितीही उपदेश केला तरी त्याच्या मनावर काहीच परिणाम होत नाही.

**गाव करी ते राव न करी** – समुदायाने जे काम होईल ते राजाच्या हातूनही होणार नाही; श्रीमंत मनुष्य पैशाच्या बळावर जे करू शकणार नाही, ते सामान्य माणसे एकीच्या बळावर करू शकतात.

**गाढवांचा गोंधळ व लाथांचा सुकाळ** – मूर्ख लोक एकत्र आल्यास चांगले काम न होता, गोंधळातच भर पडते.

**गावंढ्या गावात गाढवी सवाशीण** – वासरात लंगडी गाय शहाणी.

**गाड्याबरोबर नळ्याची यात्रा** – मोठ्या लोकांबरोबर आश्रितांचाही फायदा होतो.

**गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाही तर मोडून खाल्ली** – एखादी गोष्ट साध्य झाली तर उत्तम, नाही तर तिचा उपयोग अन्य तऱ्हेने करून घेता येईल.

**गाव सगळा मामाचा एक नाही कामाचा** – अनेक सगेसोयरे असतात, पण प्रसंगी कुणीच मदत करीत नाही.

**गाव जळे नि हनुमान बेंबी चोळे** – दुसऱ्याचे नुकसान करून नामानिराळे राहणे.

**गाढवाने शेत खाल्ले ना पाप ना पुण्य** – अयोग्य व्यक्तीला एखादी गोष्ट दिल्याने ती वायाच जाते.

**गावात राहू नको म्हटले तर म्हणे सरपंच करता का?** – लहान गोष्ट देखील करण्यास नकार दिला तर, त्यापेक्षा मोठमोठ्या गोष्टीचे विकल्प सुचविणे.

**गावात नाही झाड, एरंडाला आला पाड** – अभावग्रस्त परिस्थितीत अल्पांशाने असलेली बाब देखील मोठी समजली जाते.

**गाय व्याली, शिंगी घोडा** – अघटित घटना घडणे

**गुळाचा गणपती आणि गुळाचाच नैवेद्य** – एखाद्याचे घ्यावयाचे आणि त्याला द्यावयाचे.

**गुरूची विद्या गुरूला फळली** – एखाद्याचा डाव त्याच्यावरच उलटविणे.

**गूळ नाही पण गुळाची वाचा तरी असावी** – आपण आर्थिक दृष्ट्या गरीब असलो तरी चालेल, मात्र आपले बोलणे विनम्र असायला हवे.

**गोरा गोमटा कपाळ करंटा** – दिसण्यात सुंदर, पण नशिबाने दुर्दैवी.

**गोष्टी गोष्टी अन् मेला कोष्टी** – लांबलचक गोष्ट

एखाद्याला स्वत:ची पुष्कळ कामे असताना दुसऱ्यानेही त्याच्यावर काम लादणे.

**घरोघरी मातीच्या चुली** – जिकडे-तिकडे सारखीच परिस्थिती.

**घर ना दार देवळी बिऱ्हाड** – घरदार, बायको, पोरे नसणारा सडाफटिंग मनुष्य.

**घरच्या म्हातारीचा काळ** – बाहेर नम्रपणे वागणे व घरात मात्र कर्दनकाळासारखे वागणे.

**घरचे ओज अंगण सांगे** – घरात किती टापटीप आहे हे त्याच्या अंगणावरूनच समजते.

**घरात नाही तीळ अन् मिशांना देतो पीळ** – रिकामा डौल दाखविणारा मनुष्य.

**घरी शिमगा अन् बाहेर दिवाळी** – घरात खूप गरिबी आणि बाहेर मात्र उधळपट्टी.

**घर ना दार वाऱ्यावर बिऱ्हाड** – फकिरासारखे जीवन जगणे.

**घर चंद्रमौळी आणि बायकोला साडी चोळी** – घरची गरिबी, पण बायकोसाठी खूप खर्च.

**घरात साला आणि शेतात नाला नसावा** – घरात मेहुणा राहिला तर घरभेदीपणा होतो. तसेच शेतात नाला असला तर शेतीतील माती वाहून जाते.

**घरात नाही कौल, रिकामा डौल** – घरात गरिबी, पण रिकामीच ऐट.

**घटकेत सौभाग्यवती, घटकेत गंगा भागीरथी** – कधी खूप लाड करावे, प्रेम करावे आणि कधी शिव्या द्याव्यात.

**घरचे खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजणे** – स्वत:चा खर्च करून इतरांची कामे करणे.

**घरच्या आईला डाकीण कोण म्हणणार?** – आपल्याच व्यक्तीला कोण वाईट म्हणेल?

**घरासारखा गुण, सासू तशी सून** – लहान मोठ्यांचे अनुकरण करीत असतात.

**घटका पाणी पिते, घड्याळ टोले खाते** – वेगवेगळ्या माणसांना आपआपल्या कर्मानुसार सुख-दु:खे भोगावी लागतात.

**घरी नाही ज्वारी अन् आजी पुऱ्या करी** – बाष्कळ बढाया मारणे.

**घार फिरे आकाशी तिचे लक्ष पिल्लापाशी** – बाळापासून आई कितीही दूर असली तरी तिचे मन त्याच्यापाशीच असते.

**घाण्याचा सुटला आणि नांगराला जुंपला** – एखाद्यास एखाद्या अवघड प्रतीच्या एका कामातून मुक्त करून दुसऱ्या तेवढ्याच कष्टप्रद कामास जुंपणे.

**घुसळतीपेक्षा उकळतीचे घरी अधिक** – श्रम करून पोट भरणाऱ्यापेक्षा लुबाडणाऱ्याची चैन अधिक.

**घे सुरी अन् घाल उरी** – फाजील उत्सुकता दाखविणे.

**घेता दिवाळी, देता शिमगा** – घेताना आनंदाने घेणे, देण्याची वेळ आली की, बोंबाबोंब करणे.

**घोंगड्यात पासोडा सरदार** – सुमार व सामान्य माणसांमध्ये थोडासा सधन माणूसही प्रतिष्ठित, मोठा मानला जातो.

**घोडी मेली ओझ्याने व शिंगरू मेले हेलपाट्याने** – आई काम करून-करून थकते आणि तिचं मूल तिच्या मागे फिरून-फिरून थकून जाते.

**घोडं आपल्या गुणावर चंदी खातं** – व्यक्तीच्या चांगल्या वाईट गुणांवर त्याचा मानमरातब अवलंबून असतो.

**घोड्यावर हौदा, हत्तीवर खोगीर** – एखाद्या वस्तूचा चुकीच्या पद्धतीने उपयोग.

**घोड्याची टाच, कुत्र्याचा दात विश्वासता डसे, मारी लाथ** – संभाव्य धोका किंवा संकटाबद्दल आधीपासूनच सावधगिरी बाळगावी.

### – वाक्यात उपयोग –

- **घर फिरले म्हणजे घराचे वासेही फिरतात**

भरभराटीत चालणाऱ्या व्यवसायात अचानक खो आल्याने अगदी जवळचे नातेवाईकही अनिकेत

**चिंती परा ते येई घरा** – दुसऱ्याचे वाईट व्हावे अशी इच्छा केली की आपलेच वाईट होते.

**चित्त नाही थारी, बावन तीर्थे करी** – मनाला समाधान नसले, तर तीर्थयात्रा करूनही ते मिळत नाही.

**चिखलात मेख वाकवावी तिकडे वाकणार** – निराधार माणसाला पाहिजे तसं वाकवून घेता येते.

**चिखलात दगड टाकला आणि अंगावर शिंतोडा घेतला** – स्वत:च्याच हाताने स्वत:ची बदनामी होईल अशी कृती करणे.

**चिकणी सुपारी पिकले पान, सोड म्हसोबा आमची आण** – एखादी चांगली वस्तू अथवा पैसा देऊन दुष्ट माणसाला अनुकूल करून घेणे.

**चुलीपुढे शिपाई अन् घराबाहेर भागूबाई** – घरात तेवढा शूरपणाचा आव आणायचा; पण बाहेर मात्र घाबरायचे.

**चुकल्या म्हशी दिल्या आंदण** – ज्या वस्तू शोधाशोध करूनही सापडण्याची सुतराम शक्यता नाही, त्या भेट म्हणून दिल्याचे औदार्य भासवणे.

**चोपडीबाई कुठं गेली, आंबट कढी उतू आली** – मूळचा स्वभाव काही बदलत नसतो.

**चोराची पावले चोरास ठाऊक** – वाईट माणसांनाच वाईट माणसांच्या युक्त्या कळतात. एखाद्या क्षेत्रातील खाचाखोचा त्याच क्षेत्रातील व्यक्तीस ठाऊक असतात.

**चोरावर मोर** – एखाद्या गोष्टीच्या बाबतीत दुसऱ्यापेक्षा वरचढ ठरणे. शेरास सव्वा शेर. ठकास महाठक.

**चोराला सुटका आणि सावाला फटका** – चोर सोडून निरपराधी माणसाला पकडणे.

**चोर सोडून संन्याशाला फाशी** – अपराधी सोडून निरपराधीला सजा.

**चोरीचा मामला हळूहळू बोंबला** – पापकर्म केल्यामुळे आपत्ती आली किंवा हानी झाली तरी न ओरडता निपटून घ्यायचे असते.

**चोर तो चोर वर शिरजोर** – चोरी तर केली आणि आणखी शिरजोरी.

**चोराच्या मनात चांदणे** – अपकृत्य करणाऱ्याच्या मनात ते उघडकीस येण्याची कायम भीती असते.

**चोराच्या हातची लंगोटी** – ज्याच्याकडून काहीही मिळण्याची आशा नाही, त्याच्याकडून थोडेसे का होईना प्राप्त होणे.

**चोराच्या उलट्या बोंबा** – स्वत:च गुन्हा करून दुसऱ्याच्या नावाने ओरडणे.

– वाक्यात उपयोग –

- **चालत्या गाडीला खीळ**

इमारत बांधून पूर्ण झाल्याने तेथील कामगार जागा सोडून गेले. यामुळे मजुरांच्या मुलांना शिक्षण देण्याच्या अवनीच्या उपक्रमाच्या **चालत्या गाडीला खीळ बसली.**

- **चुलीपुढे शिपाई अन् घराबाहेर भागूबाई**

घरातल्या सर्वांवर दादागिरी करून डाफरणारा विजय बाहेर गेल्यावर मात्र सर्वांचे खालमानेने निमूटपणे ऐकून घेई. म्हणून त्याची आई गमतीने म्हणायची, **'आमचा विजय म्हणजे चुलीपुढे शिपाई अन् घराबाहेर भागूबाई'**.

- **चिखलात दगड टाकला आणि अंगावर शिंतोडा घेतला**

भांडखोर सदाबरोबर वाद घालून मनस्ताप झाल्यावर मनोज म्हणाला, **'चिखलात दगड टाकला आणि अंगावर शिंतोडा घेतला'**.

- **चोराला सुटका आणि सावाला फटका**

अंकित आणि समीरच्या भांडणात अंकितची काहीही चूक नसतानाही शिक्षक त्यालाच रागावले. अंकितच्या मनात आलं, **चोराला सुटका आणि सावाला फटका.**

- **चोरीचा मामला आणि हळूहळू बोंबला**

**जगाच्या हाती दोन धोंडे** – समाज जीवनात दोन प्रकारचे लोक असतात, एक टीकाकार दुसरे प्रशंसक.

**जळत्या घरावर वांगी भाजून घेणे** – दुसऱ्याच्या नुकसानात आपला फायदा करून घेणे.

**ज्याचे दळ त्याचे बळ** – ज्या राष्ट्राजवळ सक्षम सैन्य असते ते राष्ट्र दुसऱ्यावर वर्चस्व गाजविते.

**जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे** – अनुभव मिळाल्यानेच कोणत्याही गोष्टीची कल्पना येते; तोपर्यंत फक्त दुरून डोंगर साजरे वाटतात.

**जावयाचे पोर आणि हरामखोर** – जावयाच्या पोराला कितीही चांगले वागवा तरी तो केलेले उपकार स्मरत नाही.

**जावा जावा आणि उभा दावा** – जावा–जावांचे कधी पटत नाही.

**जात्यावर बसले म्हणजे ओवी सुचते** – काम करावयास आरंभ केला की ते पूर्ण करण्याचे अनेक मार्ग सुचतात.

**जानवे घातल्याने ब्राह्मण होत नाही** – बाह्य वेष केल्यामुळे मूळ स्वभाव बदलत नाही.

**जाळाविण कढ नाही, मायेविण रड नाही** – खऱ्या प्रेमाशिवाय दुसऱ्याबद्दल सहानुभूती, दया किंवा त्यागाची भावना निष्पन्न होत नाही.

**ज्याचे हाती ससा, तो पारधी** – एकाचे कर्तृत्व पण ते दुसऱ्याच्या नावे गाजणे. जी व्यक्ती एखादी गोष्ट करू शकत नाही, पण ती केल्याचे दाखवू शकते तिच्याकडेच ती गोष्ट केल्याचे श्रेय जाते.

**ज्याचा खावा ठोंबारा, त्याचा राखावा उंबरा** – ज्याचे अन्न खावे त्याच्याशी एकनिष्ठ असावे.

**ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी** – एकाच परिस्थितीत राहाणारी माणसे एकमेकांना चांगली ओळखून असतात.

**ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी** – जो आपल्याला मदत करेल त्याच्याशी कृतज्ञ राहावे, त्याचेच गुणगाण गावे.

**ज्याचे पोट दुखते तोच ओवा खातो** – ज्याला दुःख भोगावे लागते त्यालाच त्याची कल्पना येते.

**जित्या हुळहुळे आणि मेल्या कानवले** – जिवंतपणी खाऊ न घालणे, पण मेल्यावर गोडधोड करून लोकांना जेवू घालणे.

**जिकडे सुई तिकडे दोरा** – प्रमुख व्यक्तीच्या मागे त्याच्या हाताखाली काम करणारे लोक असतात.

**जिकडे घुगऱ्या, तिकडे उदो उदो** – ज्याच्याकडे खायला मिळते, त्याची प्रशंसा लोक करतात.

**जिकडे धर्म, तिकडे जय** – न्यायाच्या बाजूचाच शेवटी विजय होतो.

**जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही.** – माणसाला ज्या सवयी असतात त्या शेवटच्या क्षणापर्यंत असतात.

**जित रोटी मेलीया माती** – जिवंतपणी अन्न, मेल्यावर मूठमाती.

**जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारी** – आई मुलावर जे संस्कार करते ते संस्कार त्याच्यावर जन्मभर टिकतात.

**जीव जावो की जिलेबी खावो** – कितीही संकटे येवो तरी न भिणे.

**जी खोड बाळा ती जन्मकळा** – लहानपणी लागलेल्या सवयी जन्मभर टिकतात.

**जे न देखे रवि ते देखे कवि** – कवी आपल्या कल्पनेच्या जोरावर वास्तवाच्या पलीकडचे पाहू शकतो.

**जे फार भुंकते, ते चावरे नसते** – बडबड्या माणसाचे हातून काहीही होत नाही.

**जे चकाकते ते सर्व सोने नसते** – ज्या वस्तू वरून चकाकतात त्या सर्व सोन्याच्याच असतात असे नाही.

**जेथे जेथे धूर तेथे अग्नी**– कार्य आहे तेथे कारण असतेच.

गावकरी सगळीकडे धावले पण कागदपत्रे नसल्याने हाती काहीच लागले नाही. **धावाधाव धावले आणि फजित पावले** याचा प्रत्यय त्यांना आला.

## न

**नंदी आला घरा, त्याचा आदर करा** – पाहुणा जरी नको असला तरी त्याचेही स्वागत करावेच लागते.

**नऊ कारभारी, अठरा चौधरी** – अनेक मालक जिथे असतात तिथे अनागोंदी कारभार असतो.

**न कर्त्याचा वार शनिवार** – ज्याला काम करायचे नाही तो काही ना काही सबबी सांगून ते काम टाळतो.

**नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न** – एखादे काम आधीच कठीण त्यात आणखी अडचणीवर अडचणी येणे.

**नकटे राहावे, पण धाकटे होऊ नये** – परिस्थितीशी जुळवून घ्यावे पण हलकेपण वा गौणत्व पत्करू नये.

**नखाने काम होते त्याला कुऱ्हाड कशाला** – जे काम थोडक्यात होऊ शकते त्याला मोठी शक्ती कशाला वापरायची? गुळाने मरणाऱ्याला विष कशाला?

**न खात्या देवा नैवेद्य** – ज्याला एखाद्या गोष्टीची आवश्यकता नाही त्याला ती गोष्ट देऊ करणे. (कारण तो ती स्वीकारणार नाही, हे मुळातच माहीत असते.)

**नदीचे मूळ आणि ऋषीचे कूळ पाहू नये** – कोणत्याही थोर माणसाचा वा चांगल्या वस्तूचा मूळ इतिहास पाहू नये.

**न मागे तयाची रमा होय दासी** – जो मनुष्य याचना करीत नाही, त्याच्या जवळ स्वयं लक्ष्मी चालून येते

**नवरा जातो नवरीसाठी वऱ्हाड जाते खाण्यासाठी** – सोबत असले तरी प्रत्येकजण आपापला फायदा पाहात असतो.

**नवरा मरो नवरी मरो उपाध्यायाला दक्षिणेशी जरूर** – कोणाचे काही का होईना; आप हितसंबंध सुरक्षित राहिले म्हणजे बस्स!

**नवा मनू नवा धनू** – सुधारलेला काळ आ सुधारलेली हत्यारे.

**नवी वीट नवे राज्य** – नव्या जमान्यात सर्व गो नव्या पद्धतीने चालू असतात.

**नव्याचे नऊ दिवस** – कोणत्याही गोष्टीची नवल थोडाच काळ टिकते. नंतर त्या गोष्टीचे महत्त्व क होते.

**नळी फुंकिली सोनारे, इकडून तिकडे गेले वारे** केलेल्या उपदेशाचा काहीच उपयोग न होणे.

**नगाऱ्यापुढे तुणतुणे** – मोठ्या गोष्टीपुढे किरको गोष्टीत कोण लक्ष देतो ?

**नव्याचे नऊ दिवस, मेल्याचे तीन दिवस** मानवी स्वभावानुसार कौतुक तात्पुरते असते आ कोणतेही दुःख अल्पकाळ टिकणारे असते.

**नव्या नवरीचे नऊ दिवस** – प्रत्येक व्यक्तीचा आ गोष्टीचा विशिष्ट काळ असतो, त्या काळापुरतेच त गोष्टीला महत्त्व दिले जाते.

**नाकापेक्षा मोती जड**– कनिष्ठ दर्जाचा मनु वरिष्ठाहून वरचढ होणे.

**नाक खाजवले आणि नकटे वरमले** – चांगल दृष्टीने जरी एखादी गोष्ट म्हटली तर वाईट आ असे समजणे.

**नाक दाबले की तोंड उघडते** – एखाद्याकडून का करून घ्यावयाचे असल्यास त्याच्या मर्मावर बो ठेवावे म्हणजे काम आपोआप होते.

**नाचता येईना अंगण वाकडे** – एखादे काम चां करता न आल्यास काहीतरी खोड काढणे.

**नात जावयाने नेली, बुढी आपटू आपटू मेली** खऱ्या मालकानं आपली वस्तू नेली की इतर गप्पच राहावे लागते.

**नामदार तो नम्र फार** – जो श्रेष्ठ असतो तो विन

ढकलणे. ज्यांचा एकमेकांशी संबंध नाही अशा गोष्टी जुळवणे.

**वड्याचे तेल वांग्यावर** – एकाचा राग दुसऱ्यावर काढणे.

**वचने किं दरिद्रता?** – प्रत्यक्षात काहीच मदत करायची नाही; पण बोलताना उदारपणा दाखवायचा; नुसत्या बोलण्याने काम होते तर बोलायला कमी कशासाठी करायचे.

**वऱ्हाडणीला पापड जड** – जाणूनबुजून नाजूकपणा दाखविण्याची वृत्ती.

**वरातीमागून घोडे** – योग्य वेळ निघून गेल्यावर काम करणे व्यर्थ.

**वळणावरचे पाणी वळणावरच जाणार** – निसर्गाच्या नियमाप्रमाणे ज्या गोष्टी घडावयाच्या आहेत, त्या घडतच राहणार.

**वळचणीचे पाणी ओढ्याला जात नाही** – लहान माणूस, कितीही केले तरी मर्यादेपेक्षा मोठा होत नाही.

**व्यक्ती तितक्या प्रकृती** – प्रत्येकाचा स्वभाव भिन्न असतो. जितकी माणसे तितके त्यांचे स्वभाव.

**वाघ म्हटले तरी खातो, वाघोबा म्हटले तरी खातो** – दुष्ट मनुष्याचा कितीही आदर केला तरी तो दुष्टता सोडत नाही.

**वाघाचे घरी शेळी पाहुणी** – दुर्जनाच्या तावडीत सज्जन मनुष्य.

**वाकड्या मेढीस वाकडा नेम** – जशास तसे.

**वाकड्या बोटाशिवाय तूप निघत नाही** – जेव्हा सरळ मार्गाने काम होत नाही त्यावेळेस वाकड्या मार्गाचा अवलंब करावाच लागतो.

**वाटेला नाही फाटा, तर वाटे हेलपाटा** – सरळ रस्ता कंटाळवाणा वाटत असतो.

**वाहिली ती गंगा, राहिले ते तीर्थ** – कोणत्याही वेळी मंगलदायक वस्तू.

**वासरात लंगडी गाय शहाणी** – अडाणी माणसांमध्ये थोडेसे ज्ञान असणाराही शहाणा

**वाहत्या गंगेत हात धुणे** – तापल्या तव्याव भाजून घेणे, संधीचा फायदा करून घेणे.

**वारा पाहून पाठ फिरविणे** – काळ, वेळ व पाहून वागणे गरजेचे असते. धोरणीपणाने वा

**वाऱ्यावर वरात आणि दर्यावर घाल** बेजबाबदारपणे काम करणे.

**व्याप तितका संताप** – कामाचा पसारा जि अधिक तितकी जबाबदारी व त्रास जास्त होत

**विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर** – नेहमी अ साधने सोबत ठेवणे. आपली सगळी चीजवस्त कुटुंबकबिला बरोबर घेऊन फिरणे.

**विद्वान सर्वत्र पूज्यते** – विद्वान मनुष्याचा स गौरव होतो.

**विनाशकाले विपरीत बुद्धी** – माणसाचा न व्हायचा असला तर त्याची बुद्धीही भलत्य गोष्टीकडे वळते.

**विषाची परीक्षा कशाला पाहायची?** – उगाच जी धोक्यात का घालायचा?

**विहीण झाले नाही तरी मांडवाखालून गेले आहे** प्रत्यक्ष अनुभव नसेल, पण दुसऱ्याचे पाहून माहित करून घेतलेली आहे.

**विशी विद्या तिशी धन** – योग्य वयात योग्य ती कामे केली की, त्यावरून कर्तृत्वाचा अंदाज बांधत येतो.

**विटले मन आणि फुटले मोती सांधत नाही** – दुभंगलेली मने पुन्हा जोडली जाणे कठीण असते. एखाद्याबद्दल जर मत वाईट झाले तर ते पुन्हा चांगले होणे फार अवघड असते.

**विकतचे श्राद्ध घेऊन सव्यापसव्य करणे** – मुद्दाम काही तरी उपद्व्याप करून त्रास भोगत बसणे.

**वेताळाचे मागे भुतावळ** – जसा पुढारी तसे अनुयायी. पुढाऱ्याप्रमाणेच त्याचे सर्व अनुयायी असतात, ते त्याच्या मागेच हिंडतात.

जातीने लक्ष दिल्याशिवाय एखादी गोष्ट पुरी न होणे

**सब घोडे बारा टक्के** – सगळे सारख्याच मापाने मोजणे, सर्व समान किमतीचे असणे.

**सांगितल्या कामाचा दिल्या भाकरीचा** – सांगितलेले काम करणारा व दिलेले वेतन मुकाट्याने.

**सांगकाम्या ओ नाम्या** – सांगेल तेवढेच काम करणे

**सांगी तर सांगी म्हणे वडाला वांगी** – अशक्य गोष्ट खरी आहे असे सांगणे.

**साखर हातावर कातर मानेवर** – गोड बोलून गळा कापणे.

**साठी बुद्धी नाठी** – म्हातारपण आले की बुद्धी चळते.

**सामाईक घोडे, पाण्यावाचून मेले** – सर्वांची मालकी असलेल्या वस्तूची कोणीच काळजी घेत नसतो.

**सात हात लाकूड नऊ हात ढलपी** – अतिशयोक्ती करून सांगणे.

**सारवा भिंती, म्हणे कोनाडे किती** – कामाव्यतिरिक्त विनाकारण इतर चौकशी करणे.

**सारा गाव मामाचा आणि एक नाही कामाचा** – प्रसंगी कुणीही मदत करीत नाही.

**सापाला दूध पाजले, तरी तो विषच ओकणार** – दुष्टाला कितीही चांगले वागविले तरी त्याचा दुष्टपणा जात नाही.

**सासू मेली उन्हाळ्यात, आसू आले पावसाळ्यात** – एखाद्या गोष्टीचा संबंध भलतीकडेच लावणे.

**स्नान करून पुण्य घडे तर पाण्यात बेडूक काय थोडे?** – बाह्य अवडंबराने पुण्य मिळत नाही.

**साखरेचे खाणार त्याला देव देणार**– नशीबवान माणसाला सर्व परिस्थिती अनुकूल असणे.

**सुंभ जळेल, पण पीळ जळत नाही** – मानी माणसाचे सर्वस्व गेले तरी त्याचा स्वाभिमान कायम राहतो.

**सुंठीवाचून खोकला गेला** – आपोआपच आपत्ती नाहीशी होणे.

**सुतासाठी मणी फोडणे बरोबर नाही** – क्षुल्लक गोष्टींसाठी मौल्यवान गोष्टींचा नाश करू नये.

**सुतावरून स्वर्गाला जाणे** – थोड्याशा पुराव्याने पूर्ण गोष्टीचा छडा लावणे.

**सुपातील हसतात जात्यातील रडतात** – एखादे संकट कोसळते त्या वेळी काही जणांवर त्याचा पहिला आघात होतो (जात्यातील) अशावेळी उरलेल्यांना आपण वाचलो याचे समाधान वाटते (सुपातील) पण आज ना उद्या त्यांचाही बळी जाणार असतोच.

**सुसरीबाई तुझीच पाठ मऊ** – प्रसंग पडला म्हणजे दुष्टाचीही स्तुती करावी लागते.

**सेवा करील, तो मेवा खाईल** – कष्ट करील तो चांगले फळ मिळवील.

**सोन्याहून पिवळे** – अतिशय उत्तम.

**सोंग केले सजून दिवटी गेली विझून** – ऐन वेळेवर काहीतरी अडचण येऊन काम बिघडणे.

**सोनाराकडून कान टोचला म्हणजे दुखत नाही** - योग्य व्यक्तीकडून केलेले काम चांगले होते.

**सोन्याचा काही गुण, सोनाराचा काही गुण** - यशस्वी कामामध्ये निरनिराळ्या कारणांचा समावेश असतो.

उदा: मूळ वस्तू, त्यावर काम करणाऱ्याचे कौशल्य.

## – वाक्यात उपयोग –

- **समुद्रात राहून कोरडा**

भरपूर वरकमाई होऊ शकणाऱ्या व्यवसायामध्ये असूनही विवेक प्रामाणिकपणे काम करतो, हे पाहून त्याचे सहकारी त्याला **समुद्रात राहून कोरडा** असे चिडवत असत.

- **सुंठीवाचून खोकला गेला**

गेले पंधरा दिवस सळो की पळो करून सोडणारे पाहुणे अचानक काम निघाल्याने निघून गेल्याने

नयनाला सुंठीवाचून खोकला गेल्यासारखे वाटले.

• **संशयाचे भूत तेथे काय करी धूप**

शलाकाने शेजारी पैसे चोरण्याचा प्रयत्न केला हे कळल्यावर राधामावशीचा जो तिच्यावरचा विश्वास उडाला, तो काही कितीही स्पष्टीकरणे देऊन परत मिळवता आला नाही **संशयाचे भूत तेथे काय करी धूप.**

• **सरड्याची धाव कुंपणापर्यंत**

पार्वतीकाकू अजूनही जुनाट रूढी–परंपरा कवटाळून बसली होती, कारण शिक्षण नाही आणि काही वाचन नाही. त्यामुळे **सरड्याची धाव कुंपणापर्यंत** अशी तिची अवस्था होती.

• **सत्तेपुढे शहाणपण नाही**

सुनेची बाजू कितीही बरोबर असली तरी सासऱ्यांपुढे तिचे काहीच चालले नाही, म्हणतात ना **सत्तेपुढे शहाणपण नाही**

• **सगळेच मुसळ केरात**

मुलाखतीचे बोलावणे आल्यावर सौमित्र ऐनवेळी सर्व तयारी करून घाईघाईत बाहेर पडला. पण मुलाखत सुरू झाल्यावर महत्त्वाची कागदपत्रे घरीच राहिल्याचे त्याच्या लक्षात आले आणि **सगळेच मुसळ केरात** गेले.

• **समुद्राच्या खाऱ्या पाण्याने तोंड धुवून ये म्हणणे**

मी उद्या कार्यालयी येईन, पण सकाळी सात वाजताच मला भेटायला जमेल' असे सांगून विनायकने मला **समुद्राच्या खाऱ्या पाण्याने तोंड धुवून ये म्हटले.**

• **स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही**

चार जणांना दिलेले काम वेळेत पूर्ण झाले नाही म्हणून शेवटी मैत्रेयीला स्वतःचे काम संपवून त्यांचे काम करावे लागले. म्हणतात ना **स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही.**

• **सारवा भिंती तर म्हणे कोनाडे किती**

आशाला पुस्तकाच्या फक्त टंकनाचे काम दिले तर पुस्तक किती किमतीला विकणार याचीच चौकशी तिने सुरू केली. **सारवा भिंती तर म्हणे कोनाडे किती** अशी ही अवस्था झाली.

## ह

**हजीर तो वजीर** – वेळेवर हजर असणाऱ्याला लाभ होतो.

**हसतील त्यांचे दात दिसतील** – लोकांच्या हसण्याची किंवा लोकांकडून कुचेष्टा केली जाण्याची पर्वा न करणे.

**हत्तीचे दात नाही मागे जात** – मोठा मनुष्य उच्चारलेला शब्द कधीच परत घेत नाही.

**हपापाचा माल गपापा** – फुकट लाटलेले त्याच पद्धतीने जाणे.

**हरवलेले गुरू करमळीच्या तळ्यात** – काही व्यक्तींची ठिकाणे निश्चित असतात.

**हरामाचा माल पुरत नाही** – फुकटचे मिळवलेले उपयोगाचे नसते.

**हलक्या कानाचा हलका** – स्वतःची बुद्धी न वापरणारा.

**हसे त्याला बाळसे** – जो नेहमी हसतमुख असतो तो सदा निरोगी असतो.

**हत्ती गेला अन् शेपूट राहिले** – घेतलेल्या कार्याचा मोठा भाग पार पडून थोडासा कठीण भाग शिल्लक राहणे.

**हत्तीच्या दाढेमध्ये मियाचा दाणा** – मोठ्या उपायाची गरज असताना अतिशय छोटा उपाय करणे.

**हत्ती चालतो नि कुत्री भुंकतात** – थोर माणसे आपल्या मार्गाने जातात व दुर्जन त्यांची निंदा करतात.

**हत्तीच्या पायी येते आणि मुंगीच्या पायी जाते** – रोग किंवा संकटे एकदम मोठ्या प्रमाणात येतात व